# तहसिलदार अमरावती यांचे न्यायालय

---

रा.मा.क्र.एन.ए.पी.३४/म्हसला- ४५ /२०१९-२०२०

---

अर्जदार:- श्री. मालू कन्स्ट्रक्शन तर्फे सुरज अशोककुमार तलडा, रा.अमरावती, ता.जि.अमरावती

-आदेश-

(पारीत दिनांक : १५ /११/२०१९)

अर्जदार श्री. मालू कन्स्ट्रक्शन तर्फे सुरज अशोककुमार तलडा, रा.अमरावती, ता.जि.अमरावती यांनी रामाक्र. एन.ए.पी.३४/म्हसला-४९/२०१८-१९ दिनांक.२२/०२/२०१९ चे आदेशान्वये निवासी प्रयोजनार्थ अकृषक मंजूर करण्यात आलेल्या मौजा म्हसला, ता.जि.अमरावती येथील शेत गट नं/सर्व्हे. २५/३ व २५/४ मधील १) प्लॉट क्र.३ क्षेत्र १५५२.८४ चौ.मी, २) प्लॉट क्र.२ क्षेत्र १४६७.६१ चौ.मी एकुण क्षेत्र ३०२०.४५ चौ.मी जागेचे एकत्रिकरण करुन प्लॉट क्रमांक ३+४ एकुण क्षेत्र ३०२०.४५ चौ.मी याप्रमाणे एकत्रिकरण करुन मिळणेबाबत दिनांक १४/११/२०१९ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले. अर्जासह अर्जदारांनी, सहायक संचालक नगर रचना महानगरपालिका अमरावती यांचे जा.क्र.अमनपा/ससंनर /एक/०१६१/२०१९, दिनांक.२५/०९/२०१९ अन्वये पत्रातील अटी व शर्तीनुसार उपविभागणीस मंजूरी देण्यात आली आहे.

प्रकरणांत अर्जदाराने दाखल केलेला दस्ताऐवज पत्र क्र.अका/प्रस्तु-१/भुखंड विभाजन/एकत्रिकरण/कावि-२५०९/२०१९ दिनांक.१४/११/२०१९ अन्वये तलाठी अहवाल मागवीण्यात आला.

तलाठी मौजा म्हसला, ता.जि.अमरावती यांनी सदर भुखंड एकत्रिकरण करण्यास हरकत नसल्याचा दिनांक.१४/११/२०१९ रोजीचे अहवाल अहवाल प्राप्त.

सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांचे मंजूर भुखंड अभिन्यासानुसार व त्यांचे पत्रातील अटी व शर्तीचे अधिन राहून मुळ अकृषक आदेशातील भुखंड विभाजन/एकत्रिकरणाची अट शिथील करुन व इतर शर्ती कायम ठेवून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ (१) सी नुसार भुखंड एकत्रिकरण परवानगी देण्यात येत आहे. त्यानुसार भुखंड विभाजनानंतरचे क्षेत्र खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | भुखंड धारकाचे नांव | भुखंड क्रमांक | क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|---|
| १ | श्री. मालू कन्स्ट्रक्शन तर्फे सुरज अशोककुमार तलडा, रा.अमरावती, ता.जि.अमरावती | ३+४ | ३०२०.४५ चौ.मी |
| | | **एकुण क्षेत्र** | **३०२०.४५ चौ.मी.** |

सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांचे वरील पत्रातील अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदार/प्लॉट धारक यांना बंधनकारक राहतील.

**अटी व शर्ती:-**

१) सदरहु भुखंडाचे मालकी मालकी हक्क, वारसा हक्क व हक्क सोड या संबंधाने महसुल विभागाने प्रथमतः खातरजमा करणे आवश्यक व बंधनकारक राहील.
२) प्रस्तुत विभाजनाच्या नकाशांना उक्त भागाचे समुचित प्राधिकरण आपण असल्याने त्यास प्रथमतः मंजूरी देण्यात यावी.
३) प्रस्तुत उपविभागनी मंजूरीअंती भुखंड उपविभाजीत भुखंडाचे मालकी हक्क अंतिम करणे आवश्यक व बंधनकारक राहील.
४) या कार्यालयाकडील यापुर्वीचे पत्र क्र. TPVA/Cpnv/Rajura/३१५, दि.०७.०२.१९८० व अकृषक आदेशातील सर्व अटी यापुढेही अर्जदार विकासकर्ते / भुखंडधारक यांचेवर बंधनकारक राहतील.

५) सदरहू प्रकरणात भुखंड विभाजन/एकत्रिकरणाचे नकाशांना मंजूरीची शिफारस करताना अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांनी प्रकरणासोबत दाखल केलेले मालकी हक्काची कागदपत्रे व इतर कागदपत्रे ग्राह्य धरण्यात आली आहेत. सदर कागदपत्रे भविष्यात बोगस वा दिशाभुल करणारी आढळल्यास सदर विभाजनाची शिफारस आपोआप रद्द समजण्यात येईल. त्याचप्रमाणे अद्यावत मालकी हक्काबाबत खात्री आपले स्तरावरुन प्रथमतः करुन घ्यावी.

६) सदर भुखंडामध्ये बांधकाम करणेपुर्वी मा. जिल्हाधिकारी, अमरावती वा त्यांनी अधिकार प्रदत्त केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांची पुर्व विहितहरित्या परवानगी घेणे अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक आहे.

७) सदर भुखंडावर बांधकाम नियोजित करताना वा रितसर बांधकाम परवानगी घेतल्यानंतर उक्त भुखंडात प्रत्यक्षतः बांधकाम करतांना मंजूर प्रादेशिक योजना अमरावती करीता लागु असलेल्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे पालन करणे अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक आहे.

८) विभाजन/एकत्रिकरण अंतीच्या भुखंडामध्ये सामाईक भिंतीचे (Semi Detached) पध्दतीने बांधकाम अनुज्ञेय राहील. सदर भुखडांच्या सामाईक हद्दीवर सामाईक भिंत प्रस्तावित करुन वर नमूदप्रमाणे मंजूरीअंती व परवानगी अंती त्यानुसार बांधकाम करणे अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांचेसह सर्व संबंधितावर बंधनकारक राहील.

तहसिलदार अमरावती

प्रतिलिपीः-

१) सहायक संचालक नगर रचना महानगरपालिका अमरावती यांना माहितीस.
२) तलाठी मौजा म्हसला, ता.जि.अमरावती यांनी उपरोक्त प्रमाणे नोंद करुन घ्यावी.
३) श्री. मालू कन्स्ट्रक्शन तर्फे सुरज अशोककुमार तलडा, रा.अमरावती, ता.जि. अमरावती यांना माहितीस रवाना.

तहसिलदार, अमरावती